# All India Council for Technical Education

**(A Statutory body under Ministry of Education, Govt. of India)**

Nelson Mandela Marg,Vasant Kunj, New Delhi-110070 Website: www.aicte-india.org

## APPROVAL PROCESS 2022-23

## Letter of Approval (LoA)

F.No. Western/2022-23/1-11326171061 Date: 26-Sep-2022

To,
The Secretary,
Tech. & Higher Education Deptt.
Govt. of Maharashta, Mantralaya,
Annexe Building, Mumbai-400032

**Sub: Letter of Approval for New Institution 2022-23**

Sir/Madam,

In terms of the provisions under the All India Council for Technical Education (Grant of Approvals for Technical Institutions) Regulations, 2020 Notified on 4th February, 2020 and amended on 24th February 2021 and other notifications, as applicable and published from time to time, I am directed to convey the approval to

| Permanent Id | 1-11326171061 | Application Id | 1-11326171061 |
|---|---|---|---|
| Name of the Institute | DR R G BHOYAR ARTS COMMERCE AND SCIENCE COLLEGE FORMERLY VIDYABHARTI COLLEGE | Institute Address | Nagpur- Wardha Highway Mohanapur Seloo,Seloo,Wardha,Maharashtra,442 104 |
| Institute Type | Govt Aided | Region | Western |

**To conduct following Courses with the Intake indicated below for the Academic Year 2022-23***

| Sr. No. | Level | Program | Course | Affiliating Body (Univ/Body) | Intake Approved for 2022-23# |
|---|---|---|---|---|---|
| 1 | POST GRADUATE | MANAGEMENT | MBA | Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur | 60 |

**# 10% seats will be allowed over and above the Approved Intake to accommodate reservation for EWS as per State Government Policy.**

***Note: The approval is valid for two years from the date of issue of this letter only for getting affiliation with respective University/ Board of Technical Education (BTE)/ Board of Technical Education & Training (BTET) (as applicable) and fulfilling State Govt. requirements for admission. If institution is unable to start in the academic session 2022-23 due to reason mentioned above, the institution will have to apply On-line on AICTE web portal in next academic session for continuation of approval.**

The Institution shall obtain necessary affiliation / permission from the concerned affiliating University/ Board of Technical Education (BTE)/ Board of Technical Education & Training (BTET)(as applicable) as per the prescribed schedule of the University/ Board of Technical Education (BTE)/ Board of Technical Education & Training (BTET)(as applicable) Admission authority etc. The Applicant Society/Trust/Institution shall send information about commencement of the above courses to AICTE. In case the Institution is not in a position to commence the above mentioned courses for whatever reason during the two years period from the date of issue of this letter, the approval becomes invalid and the applicant Society/Trust/Institution shall make fresh application to AICTE for grant of approval as per the norms prevailing at that time.

All Institutions shall fulfill the following general conditions:

1. The management shall provide adequate funds for development of land and for providing related infrastructural, instructional and other facilities as per norms and standards laid down by the Council from time to time and for meeting recurring expenditure.
2. The Eligibility Criteria for admissions shall be made in accordance with the regulations notified by the Council from time to time.
3. The tuition and other fees shall be charged as prescribed by the Competent Authority within the overall criteria prescribed by the Council from time to time. No capitation fee shall be charged from the students/ guardians of students in any form. If found so, appropriate action as per the notified regulations shall be initiated against the Institution
4. The Curriculum of the course, the procedure for evaluation / assessment of students shall be in accordance with the Model Curriculum and Examination Reforms prescribed by the AICTE from time to time.

5. The management of the Institution shall not discontinue any course(s) or start any new course(s) or alter intake capacity of seats without the prior approval of the Council.
6. No excess admission shall be made by the Institution over and above the approved intake under any circumstances. In case any excess admission is reported to the Council, appropriate action as per the notified regulations shall be initiated against the Institution.
7. The Institution shall not have any collaborative arrangements with any other Indian and / or Foreign Universities for conduct of technical courses without obtaining prior approval from AICTE. In case any violation is reported to the Council, appropriate action as per the notified regulations shall be initiated against the Institution
8. The Institution shall not conduct any course(s) as specified in the Approval Process Handbook without prior permission / approval of AICTE. If found so, appropriate action as per the notified regulations shall be initiated against the Institution.
9. The Institution shall operate only from the approved location, and that the institution shall not open any off campus study centers / extension centers directly or in collaboration with any other institution / university / organization for the purpose of imparting technical education without obtaining prior approval from the AICTE. If found so, appropriate action as per the notified regulations shall be initiated against the Institution.
10. The accounts of the Institution shall be audited annually by a certified Chartered Accountant and shall be open for inspection by the Council or persons authorized by it.
11. Heads of Departments, the teaching and other staff shall be appointed in given time frame and selection shall be done according to procedures, qualifications and experience prescribed by the Council from time to time and pay scales are as per the norms prescribed by the AICTE from time to time. The Institution shall publish an information booklet before commencement of the academic year giving details regarding the Institution and courses / programs being conducted, Fees charged and details of infrastructural facilities including faculty etc. in the form of mandatory disclosure. The information booklet may be made available to the stakeholders of the technical education. The mandatory disclosure information, as per directions in the AICTE website / Approval Process Handbook, shall be put on the Institution Website. The information shall be revised every year with updated information about all aspects of the Institution.
12. It shall be mandatory for the Institution to maintain a Website providing the prescribed information. The Website information must be continuously updated as and when changes take place.
13. If the Institution fails to disclose the information or suppress and / or misrepresent the information, appropriate action as per the notified regulations shall be initiated against the Institution.
14. AICTE may also conduct inspections with or without notifying the dates to verify specific complaints, to verify adherence to AICTE norms & standards, and to verify any mis-representation, violation of norms & standards, mal-practices etc.
15. The Institution by virtue of the approval given by Council shall not automatically become claimant to any grant-in-aid from the Central or State Government.
16. In the event of a student / candidate withdrawing before the starting of the course, the wait listed candidates should be given admission against the vacant seat. The entire fee collected from the student, after a deduction of the processing fee of not more than Rs. 1000/- (Rupees one thousand only) shall be refunded and returned by the Institution to the student / candidate withdrawing from the program. It would not be permissible for the Institution to retain the School / Institution Leaving Certificates in original to force retention of admitted students and not to charge fees for the remaining period if a student cancels the admission at any point of time.
17. The Institution shall take appropriate measures for prevention of ragging in any form, in the light of AICTE regulation "Prevention and Prohibition of Ragging in Technical Institutions, Universities including Deemed to Universities imparting technical education" Regulation 2009 (F.No. 37-3/Legal/AICTE/2009 dated 01/07/2009). In case of failure to prevent the instances of ragging by the Institutions, the Council shall take appropriate action as per the notified regulations.
18. It is mandatory to comply all the essential requirements as given in APH 2022-23(appendix 6)

The Government/ Management of the Institution shall strictly follow further conditions as may be specified by the Council from time to time. The Council may withdraw the approval, in case it observe any violation of the above conditions and/or non- adherence to the norms and standards prescribed by the Council, mis-representation of facts and submitting factually incorrect information to it.

**Note : LOA as per Court order**

NOTE: If the State Government / UT / DTE / DME has a reservation policy for admission in Technical Education Institutions and the same is applicable to Private & Self-financing Technical Institutions, then the State Government / UT/ DTE / DME shall ensure that 10 % of Reservation for EWS would be operational from the Academic Year 2022-23. However, this would not be applicable in the case of Minority Institutions referred to the clause (1) of Article 30 of Constitution of India.

**Prof. Rajive Kumar**
**Member Secretary, AICTE**

Copy to:

1. **The Director Of Technical Education**,** Maharashtra

2. **The Registrar**,**
   Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur

3. **The Principal / Director,**
   Dr R G Bhoyar Arts Commerce And Science College Formerly Vidyabharti College
   Nagpur- Wardha Highway Mohanapur Seloo,
   Seloo, Wardha,
   Maharashtra, 442104

4. **The Regional Officer,**
   All India Council for Technical Education
   Industrial Assurance Building
   2nd Floor, Nariman Road
   Mumbai - 400 020, Maharashtra

5. **Guard File(AICTE)**

---

Note: Validity of the Course details may be verified at http://www.aicte-india.org/

****** Copy of this letter will not be communicated through Post/Email. However, provision is made in the AICTE portal for downloading letter through Authorized login credentials allotted to concerned State Secretary / DTE/ Registrar.

**अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेस शासन मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. मान्यता-२०२२/प्र.क्र.१४७/तांशि-४**
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १२ ऑक्टोबर, २०२२.

<u>वाचा</u> : १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.वेस्टर्न/२०२२-२३/१-११३२६१७१०६१, दि.२६.०९.२०२२.
२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/अेआयसीटीई-मान्यता /२०२२/९६०, दि.१०.१०.२०२२.

**<u>प्रस्तावना :</u>**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी वर नमूद क्र.१ येथील दि.२६.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन संचालक, तंत्रशिक्षण यांनी वर नमूद क्र.२ येथील दि.१०.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये विद्यमान कायम विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थेस द्यावयाच्या शासन मान्यतेकरीता शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून उक्त संस्थेस शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे प्रचलित अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.:-

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | अभ्यासक्रमाचे नाव | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ची प्रवेश क्षमता | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीताची प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ.आर.जी.भोयर आर्टस कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज फॉर्मर्ली विद्याभारती कॉलेज नागपूर-वर्धा हायवे मोहनापूर सेलू, वर्धा - ४४२ १०४. | एमबीए | -- | ६० |

अटी व शर्ती:-

१) सदर मान्यता कायम विना अनुदान तत्वावर राहील.
२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.
३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) संबंधित खाजगी संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंगसंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती संस्थेस लागू राहतील.

३. जर संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नसेल, तर संस्थेकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये या शासन मान्यतेनुसार अभ्यासक्रमाचा समावेश होण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण यांनी आवश्यक ते आदेश पुढील १५ दिवसाच्या आत निर्गमित करावेत.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२१०१२१०५३१४८२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(नि.ज्यो.घिरटकर)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३. संबंधित अकृषि विद्यापीठाचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
५. संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
७. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
८. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
९. निवड नस्ती/तांशि-४.

महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२,
ई-मेल–desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट:http://www.dtemaharashtra.gov.in


क्र. २/एनजीसी/मॅनेजमेंट/मान्यता/(१५१/२०२२)/ ८८२ दिनांक: 14 OCT 2022

प्रति,
प्राचार्य,
डॉ.आर.जी.भोयर आर्टस कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज
फॉर्मर्ली विद्याभारती कॉलेज, नागपूर-वर्धा हायवे,
मोहनापूर, सेलू, वर्धा - ४४२ १०४

(डीटीई कोड )

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर नवीन एम.बी.ए. महाविद्यालय सुरु करण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क. मान्यता- २०२२/प्र.क्र.१४७/तांशि ४, दि.१२.१०.२०२२

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर नवीन एम.बी.ए. महाविद्यालय खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह विहित अटींच्या अधिन राहून सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | एमबीए | ६० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र “अ” व “ब” या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदान तत्वावर नवीन एम.बी.ए. महाविद्यालय सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु १०.५० लाख खाते क्र. ४१३४७९४८१९४ दि. १३.१०.२०२२, अन्वये स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा - सीएलटी शाखा, नागपूर रोड, वर्धा. येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत. त्याचप्रमाणे द्वितीय वर्षासाठी रु.९.०० लाख १० वर्षे मुदतीसाठी संयुक्त खात्यात जमा करुन सदर मुदत ठेवीची मूळ पावती पडताळणीसाठी या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

संदर्भाकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती राह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे नवीन एम.बी.ए. महाविद्यालय सुरु करण्यास व संबंधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेतांक क्रमाक व पासवर्डद्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासनाने, या संचालनालयाने, **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर** व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन /अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली, यांना राहतील.

५. वरील अभ्यासक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी स्थानिक चौकशी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधिन राहून दिलेल्या मान्यतेच्या आधारे मान्यता देण्यात येत असून याबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास त्यास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायर मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तूत संस्थेने आपल्या कार्यालयाकडे नोंदणी केल्याशिवाय प्रस्तूत अभ्यासक्रमांस प्रवेश करण्यात येऊ नयेत.
२. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर.
४. कार्यासन क्र. २ अ मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र.३ आयटी सेल, मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्तीस.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ**

(सेंट्रल प्रोव्हिसेंस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित, व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**महाविद्यालय विकास विभाग**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपूर-४४००१०, दूरध्वनी क्रमांक : ०७१२-२५२९९३२ फॅक्स नं. ०७१२-२५५५७०१,
e-mail ID: infoarcollege@ymail.com


**क्रमांक : म.वि.वि./प्र.संलग्निकरण/२०२२-२३/६६३** **दिनांक :** 13-10-2022

प्रती,

प्राचार्य,

**डॉ. आर. जी. भोयर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेलु**

**नागपुर-वर्धा रोड, सेलू ,जि. वर्धा ता.- सेलू, जि.- वर्धा - 442104**

**विषय :- सत्र २०२२-२३ पासुन नवीन विद्याशाखा / अभ्यासक्रम / प्रवेश क्षमता वाढीस प्रथम संलग्निकरण प्रदान करण्याबाबत.**

**संदर्भ :-** 1) शासन निर्णय क्रमांकः मान्यता-२०२२/प्र.क्र.१४७ /तांशि-४, दिनांक १२ आक्टोंबर, २०२२.

महोदय/महोदया,

आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भांकित पत्रानुसार राज्य शासनाने आपल्या महाविद्यालयास सत्र २०२२-२३ पासून खालील नवीन विद्याशाखा / अभ्यासक्रम / विषय / अतिरिक्त तुकडीस सुरु करण्यास दिलेल्या परवानगीनुसार मा.कुलगुरुंनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(७) अंतर्गत विद्या परिषदेच्या वतीने नवीन विद्याशाखा / अभ्यासक्रम / विषय / अतिरिक्त तुकडीस सत्र **२०२२-२३** पासून प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन राहून प्रदान करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

**महाविद्यालयाचे नांव** : **डॉ. आर. जी. भोयर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेलु, नागपुर-वर्धा रोड, सेलू ,जि. वर्धा ता.- सेलू, जि.- वर्धा - 442104**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 . | **पारंपारिक व्यवसायीक अभ्यासक्रम** | **विद्याशाखा**: वाणिज्य व व्यवस्थापन | **माध्यम**: [इंग्रजी] |
| | | **अभ्यासक्रम**: मास्टर ऑफ बिजिनेस अँडमिनीस्ट्रेशन - Regular Shift | **विद्यार्थी प्रवेश क्षमता**: 60 |
| | | **स्तर** : पद्व्युत्तर | **विषय**: As Per Syllabus |

**प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन प्रदान करण्यात येत आहे**

१. संदर्भांकित शासन परवानगीमध्ये नमूद केलेले संपूर्ण अटीचे पालन संस्थेने/महाविद्यालयाने विहीत कालावधीमध्ये पूर्ण करण्याच्या अटीवर संलग्निकरण देण्यात येत आहे.

२. विद्यार्थी संख्येचे निकष शासन निर्णय क्र.एनजीसी-१०९३/(५९१८)/मशि-३,दिनांक १९ जुन,१९९५ प्रमाणे महाविद्यालयावर बंधनकारक राहतील त्याचे उलंघन झाल्यास शासन निर्णय दि.२२.१.२००७ नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात यईल. तसेच विद्यापीठ निर्देश क्र. ८/२०१६ मधील तरतुदीनुसार कमीत-कमी प्रवेशाची अट पूर्ण करण्याचे अटीवर संलग्निकरण देण्यात येत आहे.

३. विद्यापीठाने विहीत केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी अध्यापक वर्ग/ कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असुन इतर सर्व आवश्यक पायाभुत सोयी उपलब्ध करुन त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करुन

विद्यापीठास तसे प्रमाणपत्र देण्याच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

४. नवीन विद्याशाखा मंजुर करण्यात आलेल्या महाविद्यालयांनी ज्यांची स्थापना होऊन ५ वर्ष झाली आहेत त्यांनी एक वर्षात व ज्यांची ५ वर्ष झालेली नाहीत त्यांची ५ वर्ष पुर्ण होताच एक वर्षात NAAC अॅक्रेडिएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळविल्यास सदर विद्याशाखा मान्यता आपोआप रद्द होईल या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

५. उपरोक्त अभ्यासक्रमाची परवानगी प्राचार्य व नियमित शिक्षक भरण्याच्या अटीवर देण्यात येत आहे.प्राचार्य व नियमित शिक्षकांची नियुक्ती न केल्यास विद्यार्थ्यांना दिलले प्रवेश रद्द होतील.

६. उपरोक्त नवीन विद्याशाखा / अभ्यासक्रम / प्रवेश क्षमता वाढ कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास आपले महाविद्यालय तयार असून त्या आशयाचे हमीपत्र महाविद्यालयाने विभागिय सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर यांना सादर करण्याचे अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे

७. प्रथम संलग्निकरण प्राप्त झाल्यानंतर ज्या महाविद्यालयांनी वरील नमुद विविध अटी व शर्तीची पुर्तता केली नाही अशा महाविद्यालयांना पुढील वर्षाकरीता निरंतर संलग्निकरण देता येणार नाही व जर अशा महाविद्यालयानी पुढील सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया केली तर प्रवेशित विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठ घेणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

८. ज्या अभ्यासक्रमाचे अभ्यासक्रमीका, अध्यादेश विद्यापीठात तयार नाही असे अभ्यासक्रम/विषय महाविद्यालयांनी सुरु करु नये.

९. कायम विना अनुदान तत्वावर संस्थेस/महाविद्यालय नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकड्यांना आर्थिकदृष्ट्या चालविणे शक्य व्हावे यासाठी संस्थेने/महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून विद्यापीठ/शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या शुल्कानुसारच शुल्क आकारावे.

१०. वरील सर्व अटींची पुर्तता तसेच पुढील निरंतर संलग्निकरणाकरीता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/बार कौन्सिल ऑफ इंडिया इत्यादी शिखर संस्थांनी घालुन दिलेल्या अटींची पुर्तता विहीत कालावधीत संस्थेने न केल्यास पुढील संलग्निकरण स्थगित होईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची/संस्थेची राहील याची नोंद घ्यावी (लागू असल्यास).

११. महाविद्यालयातील सदर नवीन विद्याशाखा / अभ्यासक्रम / प्रवेश क्षमता वाढीस पूढील वर्षासाठी निरंतर संलग्निकरणाकरीता शुल्कासह आवेदनपत्र दि. **३१ ऑगस्ट** पूर्वी किंवा प्रथम संलग्निकरण प्राप्त होताच त्याच महिन्यात निरंतर संलग्निकरणाचा अर्ज करावा लागेल अन्यथा अध्यादेशातील तरतुदीनुसार विलंब शुल्कासह www.onlinedcudrtmnu.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

कृपया कळावे.

( डॉ.रमण मदने )
उपकुलसचिव

प्रतिलीपी माहितीकरिता सादर :-

१. मा.संचालक (उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण), शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पूणे – ४११००१
२. मा. प्र-कुलगुरू
३. मा.सहसंचालक, (उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर – ४४०००१
४ मा.वित्त व लेखा अधिकारी.
५. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ
६. उपकुलसचिव विद्या विभाग.
७. सहायक कुलसचिव, सामान्य परीक्षा विभाग, गोपनिय विभाग, व्यावसयिक परीक्षा, परीक्षा व चौकशी.

} राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

८. संबंधित लिपीक, शिक्षक मान्यता.
९. संबंधित लिपीक, संलग्निकरण शाखा.

यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी

( डॉ.रमण मदने )
उपकुलसचिव